# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/उ भा अ/२०१७/ ८३९
दिनांक :- १७।२।२०१७

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रम चालविणा-या संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- नालंदा विद्यापिठाचे कुलपती तथा उन्नत भारत अभियानाचे अध्यक्ष पदमभुषण डॉ. विजयजी भटकर यांचा अमरावती येथे सत्कार सोहळयाचे आयोजन तसेच उन्नत भारत अभियानाच्या कार्यशाळेचे उद्घाटन.**

संदर्भ :- मा.आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्रमांक :- विआअ/आस्थापना/२०१६ दिनांक १६ फेब्रुवारी २०१७.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. डॉ. विजय भटकर, यांची, नालंदा विद्यापिठ, नालंदा येथे कुलपती म्हणुन नियुक्ती झालेली असल्याने त्यांचा सत्कार सोहळा तसेच राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण संस्थेच्या मदतीने राज्यातील विविध सामाजिक आणि विकासाच्या दैनदिन जिवनातील समस्याची उकल करुन त्यावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने मार्गदर्शनास्पद कार्यशाळा दिनांक २३, २४ व २५ फेब्रुवारी २०१७ रोजी सहसंचालक, लेखा व कोषागारे, लेखाकोष भवन, विद्यापिठ रोड, अमरावती येथे दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर कार्यशाळेमध्ये उन्नत भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना, कृषी विकास व ग्राम विकास, अर्थसंकल्पीय व कॅशलेस मोहीमेबद्दल जागरुकता आणि संधी तसेच ( संकल्पना व सिध्दी) याबाबत सत्कारमुर्ती डॉ. विजय भटकर, यांचे मार्गदर्शन होणार आहे.

सदर कार्यशाळेचे दिनांक २३, २४ व २५/२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजतापासुन www.jdatamt.blogspot.in या संकेतस्थळावर थेट प्रक्षेपण होणार आहेत. सदर प्रक्षेपण संगणक, प्रोजेक्टर किंवा मोबाईलवर ऑन लाईन पाहता येईल.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, सदर कार्यशाळेचे प्रक्षेपण आपल्या संस्थेतील अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थ्यांना पाहण्याकरीता आपल्या स्तरावर प्रोत्साहीत करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

प्रसहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.